**जा.क्र.पोआ/४८३४/२०२१**
**पिंपरी चिंचवड**
**दिनांक २१.०४.२०२१**

**विषय :- कोविड - १९ च्या अनुषंगाने बाजारपेठ भागात गर्दी कमी करणेबाबत.....**

**संदर्भ :** - १) मा.मुख्य सचिव, म.रा.मुंबई यांचेकडील आदेश (**DMU/2020/CR.92/DISM,1**) दिनांक २७.०३.२०२१

२) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ४३ अन्वये.

-----ooo-----

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई चे १७ एप्रिल २०२० रोजीच्या आदेशान्वये साथीचे रोग अधिनियम १८९७ चा खंड २ (१) नुसार पोलीस आयुक्त यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोविड - १९ वर नियंत्रण करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३ (१) अन्वये पोलीस आयुक्त यांना त्यांच्या प्रभाराखाली असलेल्या क्षेत्रासाठी साथीचे रोगाचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होवुनये त्यासाठी आवश्यक वाटतील अशा उपाययोजना करण्याबाबात अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३ (२), ४३ (३) अन्वये पोलीस आयुक्त यांना जमावाच्या ठिकाणी सुव्यवस्था राखण्यासाठी, व्यवस्था करण्यासाठी लागणा-या खर्चाची तरतुद करणे व वाजवी फी वसुल करणेबाबत प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी **मी कृष्ण प्रकाश पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड,** हे खालीलप्रमाणे सुचना करीत आहे. ज्याला आदेश म्हणुन समजण्यात यावा.

**१.** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व बाजारपेठा येथे बाजारपेठेकडे आजुबाजुने येणारे रस्ते (Approch Road) रस्त्यावर बॅरिकेड्स बसविण्यात येवुन परिसर सिल करण्यात यावा.

**२.** सील केलेले बाजारपेठ परिसराचे एकुण प्रवेश व बाहेर पडणारे मार्ग (Entry/Exit Point) निश्चित करुन त्या ठिकाणी महानगरपालिका व पोलीस असा संयुक्त बंदोबस्त नेमण्यात यावा.

**३.** सील केलेल्या क्षेत्रात दुकानदार, त्याचे कर्मचारी आणि हातगाडी वाल्यांना सुध्दा दुकानदार समजुन त्यांना प्रवेश पास देण्यात यावा जेणे करुन सील केलेल्या क्षेत्रात गैरसोय होणार नाही.

**४.** सील केलेल्या क्षेत्रात इतर सर्व नागरीकांना प्रवेश देण्यासाठी **५/- रुपये प्रति व्यक्ती प्रति तास** याप्रमाणे शुल्क महानगरपालिका यांनी आकारावे. तसेच नागरीकांना प्रवेश देताना बाजारपेठेत गर्दी होणार नाही याबाबत काळजी घ्यावी. तसेच सर्व Covid Appropriate Behaviour बाबत खात्री झाल्यानंतरच नागरिकांना नमुद बाजारपेठेत प्रवेश दयावा.

५. सील केलेल्या क्षेत्रात पोलीसांची पायी गस्त ठेवावी व पोलीसांनी नागरिकांच्या प्रवेश पासची वेळोवळी तपासणी करावी. प्रवेश पास नसलेले किंवा प्रवेश पासची मुदत समाप्त झालेल्या नागरीकांवर सामाजिक विशिष्ठ अंतर (Social Distancing ) न पाळण्याचे नियमाखाली ५०० रुपये दंडाची कार्यवाही करावी. यासाठी महानगरपालिका यांना दंड पावती पुस्तिका पर्याप्त मात्रामध्ये उपलब्ध करुन दयावी.

६. सदर बाबत पोलीसांनी पी.ए.सिस्टीमव्दारे नागरीकांना आवाहन करावे.

७. पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी पोलीस नियंत्रण कक्ष मार्फत दररोज या संदर्भात झोली कार्यवाहीचा तपशील पोलीस आयुक्त यांना सादर करावा. नियंत्रण कक्ष यांनी खालील तक्त्याप्रमाणे माहिती पोलीस आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांना सादर करावी.

| **अ.क्रं.** | **पोलीस स्टेशनचे नाव** | **मार्केटचे नाव** | **एकुण प्रवेश पास दिलेल्यांची संख्या** | **एकुण शुल्क जमा** | **एकुण Social Distancing न पाळल्याचे दंडात्मक कार्यवाही** | **एकुण दंड रक्कम जमा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

८. महानगरपालिका हे बाजारपेठ सील करण्याकरीता लागणारा खर्च (Barricading व इतर) साठी या आदेशाअंतर्गत जमा झालेले शुल्क व दंड रक्कमचा वापर करु शकतात.

९. सदर हा आदेश दिनांक २१.०४.२०२१ रोजी पावेतो अंमलात राहील.

**(कृष्ण प्रकाश)**
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड